INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2020 Special Issue – 217 (C)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION



**Guest Editor:**
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar

**Executive Editor of the issue:**
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2020 Special Issue –217 (C)

## IMPACT OF VALUES BASED ON M.K.GANDHI, PT. J. NEHRU, DR. B. R. AMBEDKAR & DR. PANJABRAO DESHMUKH'S PHILOSOPHIES IN PRESENT SITUATION

**Guest Editor:**
Dr. Rameshwar M. Bhise,
Principal,
Shri Shivaji College of Arts, Commerce and Science,
Akola [M.S.] INDIA

Hon. Sheshraoji S. Khade,
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amarawati

**Chief Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar

**Executive Editor of the issue:**
Dr. Jivan H. Pawar
Dr. A. S. Raut
Dr. G. V. Korape
Dr. Sanjay J. Tidke
Dr. Ananda B. Kale,
Dr. S. D. Thorat

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-



278

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 217 (C)
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. पी. एस. लोखंडे | 04 |
| 2 | राष्ट्रपिता महात्मा गांधींचे अनमोल व प्रासंगिक विचार | डॉ. यु. आर. धुमाळे | 07 |
| 3 | महात्मा गांधींची सर्व धर्म समभाव संकल्पना आणि आधुनिक काळात त्याची प्रासंगिकता | डॉ. शाम दुतोंडे | 10 |
| 4 | महात्मा गांधीचे आर्थिक विचार | डॉ. अलका मानकर | 14 |
| 5 | सद्य परिस्थितीवर महात्मा गांधींच्या तत्वाज्ञानात्मक मुल्यांचा प्रभाव | कल्याणि मंडलिक | 18 |
| 6 | डॉ. आंबेडकरांना अपेक्षित लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होताना आपली भूमिका व योगदान | डॉ. [illegible] को[illegible]ळे | 20 |
| 7 | महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाची २१ व्या शतकात गरज | प्रा. सुजाता [illegible] | 25 |
| 8 | भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून मूल्य शिक्षणाची निर्मिती | डॉ. [illegible] एफ. [illegible]उतराहे | 29 |
| 9 | महात्मा गांधीचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | डॉ. साधना कुलट | 32 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन | डॉ. [illegible] डहणकर | 35 |
| 11 | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. अलका मानकर | 38 |
| 12 | महात्मा गांधीके सर्वोदय दर्शन की प्रासंगिकता | डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर | 42 |
| 13 | Jawaharlal Nehru's Thoughts on National Development Policies | Dr. M. V. Kohale | 47 |
| 14 | An Understanding of Pt. Nehru's Idea of Parliamentary Democracy | Dr. Purushottam Deshmukh | 50 |
| 15 | The Bond between Literature and Value Education | M. A. Wasnik | 53 |


Review Copy

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Shri Shivaji Education Society, Amravati's

# SHRI SHIVAJI COLLEGE OF ARTS, COMMERCE AND SCIENCE, AKOLA

NAAC Reaccredited with A Grade (CGPA 3.24) College with Potential for Excellence [Status by UGC] Lead College [Status by SGB, Amravati University, Amravati] DST – FIST Support

One Day International Conference On

## Impact of Values based on M. K. Gandhi, Pt. J. Nehru, Dr. B. R. Ambedkar and Dr. Panjabrao Deshmukh's Philosophies in present situation"

21st January 2020

In collaboration with

**Shri Shivaji Education Society, Amravati**

# Certificate

This is to certify that Dr. /Mr. /Ms. Alka Anil Mankar of Shri Pundlik Maharaj MV Nandura has participated/poster/presented a research paper entitled महात्मा गांधीचे आर्थिक विचार in the One Day International Conference on "Impact of Values based on M. K. Gandhi, Pt. J. Nehru, Dr. B. R. Ambedkar and Dr. Panjabrao Deshmukh's Philosophies in present situation"" organized by Shri Shivaji College of Arts, Commerce and Science, Akola on January 21st, 2020.

**Hon'ble. Sheshraoji S. Khade**
Secretary,
Shri Shivaji Education Society, Amravati

**Dr. Rameshwar M. Bhise**
Principal
Shri Shivaji College, Akola

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 217 (C)
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143
January-2020

# महात्मा गांधीचे आर्थिक विचार

डॉ. अलका अनिल मानकर
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा जि. बुलढाणा

आधुनिक भारताच्या जडणघडनिमध्ये ज्या महान व्यक्तींचे योगदान लाभले आहे ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महत्मा गांधी, राजश्री शाहू महाराज, २१ व्या शतकाकडे वाटचाल करताना जागतिक स्पर्धेपुढे आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेचा टिकाव लागावा याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञान, इ-व्यापार, मोठमोठे उद्योगधंदे विकसित करणे , स्मार्ट इंडिया , मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया इ. धोरणे शासन अंमलात आणत आहे. जागतिक करणाच्या काळात संपूर्ण जग एक खेडे बनला आहे. देशाच्या विकासाकरिता ज्या योजना राबविल्या जात आहेत. त्यातून एकीकडे विकास तर दुसरीकडे भकास अशी स्थिती झालेली आहे. आधुनिक भारतासमोर ज्या अनेक समस्या आहेत त्या म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मागासलेपणा, ग्रामीण भागातील लोकसंख्येत वाढते स्थानांतरण, संसाधनांची कमतरता, वाढते शहरीकरण, पर्यावरणीय ऱ्हास, वाढती आर्थिक विषमता, शहरीकरणामुळे निर्माण होणारी जंगलतोडमातीची धूप, मातीच्या सुपीकतेचा ऱ्हास, वाळवंटीकरण, जैविक ऱ्हास , हवा , पाणी, स्वच्छतेच्या अभावामुळे जमिनीचे प्रदूषण, रासायनिक खते, कीटकनाशके, त्यांचा जमिनीचा कस व अन्नघटकांवर होणारा दुष्परिणाम इ. अनेक कारणांमुळे कृषीचीअल्प उत्पादकता, वाढती बेकारी, कुपोषण समस्या, झोपडपट्ट्या, शेतकरी आत्महत्या, ग्रामीण उद्योगांचा मागासलेपणा, दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्याअधिक आहे कारण जर हा विकास केवळ श्रीमंत शहरांपुरताच मर्यादित आहे खेड्यांचे काय? हे ज्वलंत प्रश्न जर सोडवायचे तर स्वतंत्र भारताच्या विकासाकरिता महत्मा गांधींनी जे अर्थविचार मांडले होते ते वर्तमान स्थितीत यथार्थ वाटतात.

गांधीजींनी राजकीय विकेंद्रीकरणाबरोबरच आर्थिक विकेंद्रीकरणावर सुद्धा भर दिलेला आहे. त्यांचे राजकारण, अर्थकारण मानवतावादावर आधारित आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी नेहमी आर्थिक समतेचा विचार केला. परंतु आजच्या आधुनिक भारताच्या समस्या विचारात घेतल्या तर एक महत्वाची समस्या भेडसावते टी म्हणजे आर्थिक विषमता जि सतत विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करत आहे. गांधीजी हे काही अर्थशास्त्रज्ञ नव्हते किंवा त्यांनी अर्थशास्त्रविषयक स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही परंतु त्यांनी धर्म, राजकारण आणि एकूणच जीवनाचे जे तत्वज्ञान मांडले त्यातच त्यांचे आर्थिक विचार विखुरलेले आढळतात. त्यांच्या दृष्टीने अर्थशास्त्र हे केवळ मानव जीवनाच्या तत्वज्ञानाचा एक भाग आहे. अर्थशास्त्र आणि निती यांचीफारकत करणे त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या मते नैतिक विचारांचा प्रभाव आर्थिक जीवनावर असायलाच हवा पश्चिमात्य प्रणालीतील भौतिकवादाचा अतिरेक अयोग्य असून गांधीजींच्या दृष्टीने व्यावहारिक शास्त्राला नैतिक मुल्यांची जोड दिल्याशिवाय व्यक्तीचे व राष्ट्राचे कल्याण होवू शकत नाही. महात्माजींनी ज्या विचारांचा आग्रह धरला, जे मार्गदर्शन केले ते आजच्या या जागतिकीकरणाच्या काळात अत्यंत मोलाचे वाटतात. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव आज कमी न होता उलट अलीकडील काळात देशातील व देशाबाहेरील अर्थव्यवस्थाच्या बदलत्या घडामोडी विचारात घेता तो वाढलेला दिसतो.

भारताने मिश्र अर्थव्यवस्थांचा अद्याप पूर्ण त्याग केला नसता तरी पाश्चिमात्य आकर्षण वाढले आहे. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण आज भारतातील जनता करीत असली तरी ते आपल्यासाठी तसेच संपूर्ण जगाच्या दृष्टीने हे सोयस्कर नाही. नविन आर्थिक धोरण हे भारताचे प्रश्न सोडवू शकेल यासंबंधी आज मतभेद होत आहेत.

Review Copy

आजच्या या जगतीकरणाच्या काळात भोतिकवादाचा अतिरेक वाढला आहे. आज मानवी साबंधामध्ये मुद्रा, स्पर्धा यांना अवाजवी महत्व दिले आजत आहे. जग जरी एक खेडे बनले असले तरी माणूस माणसापासून दूर जात आहे. त्यामुळे सामाजिक सबंध बिघडलेले दिसतात. महात्मा गांधीचा भौतिक वादाच्या अतिरेकाला विरोध होता त्यांच्या मते आर्थिक व्यवहाराचा पाया मौद्रिक व भौतिक असण्यापेक्षा नैतिक असायला हवा. नविन नविन तंत्रज्ञानाचा शोध लागल्यामुळे बाजारात दिवसगणिक नानाविध वस्तू उपलब्ध होतात. त्यामुळे प्रत्येक मनुष्याच्या गरजा वाढत आहेत. आज प्रत्येकाची उपभोग प्रकृती जळावल्याने त्याचे मानसिक स्वास्थ बिघडले. प्रत्येक व्यक्ती चेनीच्या वस्तूच्या मागे धावत आहे.

आज प्रत्येक जण केवळ बाह्यप्रदर्शनाला अधिक महत्व देतो. तंत्रज्ञानाच्या युगात मनुष्य ई व्यापाराकडे वळला आहे. इंटरनेटच्या वापरामुळे हवी हसणारी वस्तू बाहेरून बोलावतो त्यातच तो स्वतःला धन्य मानतो त्यामुळे गावातील वस्तूंची मागणी घटत आहे. गांधीजींच्या मते गावात निर्माण होतील अथवा पंचक्रोशीत तयार होतील अशाच वस्तूंचा वापर करावा. जेणेकरून गावातील उत्पादन वाढेल लोकांना रोजगार मिळेल.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील वाढते स्थानांतरण हि ज्वलंत समस्या आधुनिक भारतासमोर निर्माण झाली आहे. १९४५ मध्ये महात्मा गांधीनी म्हटले होते. " जर भारताला व भारतामार्फत संपूर्ण जगाला खरे स्वातंत्र्य मिळायला हवे असेल तर आपल्याला खेड्यातील झोपडीत रहायला हवे महालात नाही" याचा अर्थ असा कि देशातील जास्तीत जास्त लोकसंख्या खेड्यात राहते त्यामुळे सर्वप्रथम खेड्यातील लोकांना स्वालंबी व स्वयंपूर्ण बनवणे हि काळाची गरज आहे.

थोडक्यात ग्रामविकास हाच खऱ्या अर्थाने भारताचा विकास होय. गांधीजींच्या शिकवणीचा एक केंद्रबिंदू आहे. वाढत्या शहरीकरणामुळे झोपडपट्टीचा प्रश्न गंभीर झाला आहे तो सोडविण्यासाठी झोपडपट्ट्या काढून टाकणे हा उपायच नसून गांधीजींच्या विचारानुसार गावात परतणे व गावपातळीवर शासन व विकास यांची केंद्रे असली पाहिजे याकरिता पंचायत राज्याचा स्वीकार महत्वाचा आहे. त्यांचे तत्वज्ञान सांगते ' अंत्योदयातून सर्वोदय' व्हावा दारिद्य निर्मुलन हे केंद्रस्थानी असावे.

गांधीजी आर्थिक सुधारणावादी होते पण आर्थिक सिद्धांतवादी नव्हते गावातले शासन गावाचा पाया असणारे हवे होते हि शासन व्यवस्था स्वतः गावाने ठरवलेली असावी दुसऱ्या कोणीतरी लादलेली नसावी. गावाने मूळ गरजेच्या गोष्टींचे उत्पादन करावे त्यातून त्यांच्या गरजा भागवल्या जाव्यात, चैनीच्या वस्तूंचे उत्पादन नसावे. उत्पादनांना उपयुक्त मूल्य असावे बिकाऊ मूल्य नसावे. उत्पादन लोकांनी केलेले हवे , बहुजनांसाठी हवे थोडक्यात गावाचा केलेला विकास सगळ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसा असला पाहिजे विकासातून गरिबी वाढता कामा नये अन्यथा उत्पादनांची विपुलता असूनही लोक वंचितच राहतील गावाचे शासन ग्रामपंचायतीने काटेकोरपणे सांभाळावे.

आज जरी भारताचे शहरीकरण झपाट्याने वाढत असले तरी अजूनही ६५ % जनता खेड्यात राहते त्यामुळेच तर गांधीजींनी ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. त्यांच्या मते आदर्श समाजव्यवस्था जर निर्माण करावयाची असेल तर खेडे हा एक आपल्या देशाचा मुलभूत घटक समजून त्याला संपूर्ण स्वायत्तता लाभेल यासाठी प्रयत्न व्हायला हवे. प्रत्येक खेडे आपल्याला लागेल तेवढे शेतीचे उत्पादन काढेल. स्वतःची ग्रामोद्योग केंद्रे चालविल त्याचप्रमाणे गावातील जनावरांनसाठी कुरण देखील सोडायला हवे. गावातच शाळा, नाट्यशाळा , सार्वजनिक सभागृह, पाणीपुरवठा व्यवस्था, आरोग्य केंद्र, व्यायाम शाळा, करमनुकीची साधने असायला पाहिजे. ग्रामीण जनतेला सर्व सुविधा मिळाल्या तर गावातील प्रत्येक व्यक्ती हुशार व ग्रामीण विकास होवून भारताचा विकास होईल. परंतु आजचे चित्र पाहता ग्रामीण भागात लोकांना रोजगार नसल्याने त्यांचा लोंढा शहरात धाव घेत आहे. त्यामुळे शहरीकरण तर वाढले पण गांधींजींच्या स्वप्नातले स्वतंत्र खेडे लोप पावत

Review Copy

आहेत. खेड्यात दारिद्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या , राहणीमानाचा निकृष्ट दर्जा, सतत वाढणारी व्यसनाधीनता, कुपोषण, राहणीमनाचा निकृष्ट दर्जा यासारख्या समस्या आज देशासमोरील मोठे आव्हान आहे. भारतात अन्नसमस्या पूर्वीही होती, आता आज ज्यांच्या जवळ क्रयशक्ती आहे त्यांनाच अन्न मिळते जगाचा पोशिंदा मानला जाणारा शेतकरी शेतात राबराब राबतो परंतु त्याला उपाशी पोटी राहावे लागते. हि स्थिती जर बदलवायची असेल तर गांधीजींनी दाखविलेला मार्ग सध्याच्या काळात प्रस्तुत ठरतो. आपल्या लोकशाही समाजवादी समाजाचा पाया भक्कम करण्यसाठी आपल्याला ग्रामीण विकासावर भर द्यावा लागेल.

ग्रामोद्योगातील गांधीजींची कल्पना अशी आहे कि, आम्ही आपल्या दैनंदिन गरजा खेड्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या जिन्नसंव्दारेच भागवाव्या जे गावातून मिळत नसेल ते थोडे परिश्रम आणि संघटन करून किफायातीने उत्पन्न करता येईल कि नाही याची तपासणी करावी आणि किफाय्तीचाही विचार व्यक्तिगत नसावा. पूर्ण गावाच्या कल्याणाचा असावा. सुरुवातीला आम्हाला थोडी जास्त किंमत देऊनही कनिष्ठ प्रतीच्या वस्तू मिळतील परंतु आम्ही संबंधित कारागिरांना भरपूर उत्तेजन दिले, तर अशा किरकोळ वस्तू उत्तरोत्तर श्रेष्ठ प्रतीच्या बनत जातील हे उघड आहे ग्रामोद्योगांचा लोप झाल्यास सात लाख खेड्यांचा विनाश अटळ आहे. परंतु आज आपल्याला वास्तविकता अभ्यासली तर असे दिसते कि, अनेक ग्रामोद्योगांवर उपासमारीची पाळी येत आहे. सरकार जरी आजच्या काळात उद्योगांचा विकास व्हावा यासाठी प्रोत्साहन देत असले तरी स्पर्धेच्या काळात हे उद्योग बाह्य कंपन्यांच्या उद्योगापुढे टिकाव धरू शकत नाहीत. आजच्या या नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार आपण आपल्या देशाच्या विकासासाठी केला. परंतु गांधीजींनी देशातील रोजगार निर्मितीचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामोद्योग व कुटीरउद्योगांच्या विकासावर भर दिला. गांधीजींनी सुचविलेला आर्थिक समस्ये वरील हा उपाय आजही यथार्थ वाटते.

आपण पास्चीमात्यांचे अनुकरण चांगल्या कार्यासाठी करावे. अंधानुकरण मात्र करू नये.

शास्त्रीय व वैज्ञानिक प्रगतीला गांधीजींचा विरोध नव्हता पण यांत्रिकीकरण व अफाट औद्योगीकरण यांचे जे भयंकर दुष्परिणाम आज प्रगत देशांना जाणवत आहेत. त्याची कल्पना त्यांना असल्याकारणाने त्यांनी वाजवी औद्योगीकरणाचा व यांत्रिकीकरणाचा आग्रह धरला होता. आज वाढत्या औद्योगिकरणामुळे बेकारी वाढतांना दिसते.

देशाचा जर खऱ्या अर्थाने विकास घडवून आणावयाचा असेल तर गांधीजींच्या मते हक्क आणि कर्तव्य यांचा मेळ घातला गेला पाहिजे कर्तव्याचे योग्य पालन केल्यावरच व्यक्तीला हक्क उपभोगण्याचा अधिकार प्राप्त होतो. आज हक्क सर्वांना हवे परंतु कर्तव्याचे पालन करतांना जणूकाही मान हरपलेले दिसते. प्रत्यकानेच जर माझ्या वाट्याला आलेले काम मी मन लावून करीन , नीटनेटके करीन याची जाणीव ठेवली तर कदाचित कडक शासकीय नियमांची गरज भासणार नाही.

श्रमाची मुबलकता असणार्या भारतात उत्पादनाचे केंद्रीकरण न करता त्यांनी विकेंद्रीकरणावर भर दिला. गांधीजींच्या मते सामाजिक व उत्पादन संघटनेचा एक अविभाज्य भाग म्हणजे विकेंद्रीकरण. उत्पादनाचे केंद्रीकरण झाल्याने शहरांची अफाट वाढ , मक्तेदारी, प्रदूषण, शोषण, हिंसा अशी संकटे निर्माण होतात. विकेंद्रीकरणामुळे मोठ्या उत्पादनाशी निगडीत प्रदूषण, गलिच्छ वस्त्यांची वाढ, आरोग्यास अपय, नैतिक ऱ्हास इ. सर्व दोष टाळले जातात.

महात्मा गांधींनी ओळखलेला धोका आज प्रत्यक्षात जाणवत आहे. त्यांनी उभारलेली स्वदेशीची चळवळ आज केवळ नावापुरतीच राहिलेली आहे. स्वदेशी चळवळीमागचा गांधीजींचा उद्देश विशाल होता यातून देशप्रेमाची जाणीव प्रत्येकात निर्माण व्हावी, हा देश धन, धान्याने, उद्योगाने स्वतःच्या पायावर उभा व्हावा घराघरात उद्योग चालवा गाव स्वयंपूर्ण व्हावे म्हणजे देश स्वयंपूर्ण होतो हे सूत्र महात्माजींचे होत.

Review Copy

ISSN : 2348-7143
January-2020

त्यासाठी विद्यार्थ्यांना मुलोद्योगी शिक्षण देण्यात यावे कि जेणेकरून विद्यार्थी शिक्षण घेऊन तयार झाला तर त्याला जीवन जगण्यासाठी भिक मागायची गरज पडणार नाही. परंतु आजच्या या आपल्या देशातील शिक्षणप्रणालीच विचार केला तर B.A, B.Com च्या पदव्या घेऊन दरवर्षी लाखोच्या संख्येने विद्यार्थी बाहेर पडतात. परंतु रोजगार बोटावर मोजण्याइतक्याच विद्यार्थ्यांना मिळतो. जास्तीत जास्त बेकारांची संख्या जर कोणती असेल तर ती म्हणजे सुशिक्षितांची बेकारी म्हणून आज गांधीजींनी सांगितलेली व्यावसायिक शिक्षणप्रणाली जर अंमलात आणली तर बेकारांची संख्या कमी होईल.

थोडक्यात आजच्या या जागतिकीरणाच्या, तंत्रज्ञानाच्या काळात ज्या अनेक समस्या निर्माण होत आहेत, जसे मानसिक अशांतता, मने कोती व झाली, मानवतावाद नष्ट झाला, ग्रामीण मागासलेपणा, बेकारी ह्या समस्या जर अशाच राहिल्या माणसांची माने जोडली गेली नाही तर विज्ञान विनाशाकडे जाईल आणि म्हणून आज गरज आहे. " विज्ञान आणि गांधी." आज अमेरिकेसारख्या देशाला देखील गांधीजींचे तत्वज्ञान हवेसे वाटते. अमेरिकन युवकांनी, "We Want Peace-No War" या नावाने संघटना उभी केली. जगभर बुद्ध हवा-युद्ध नको हि भावना बळावली. अशावेळेस आज आपल्याला देखील गांधीजी मुल्ये आचरणात आणावी लागतील. केवळ भौतिक प्रगतीला महत्व देऊन चालणार नाही तर नैतिक मुल्यावर अधिक भर देऊन आपल्या अर्थकारणाचा पाया भक्कम केल्यास निश्चितच २०२० मध्ये भारत देश महासत्ता बनेल.

संदर्भग्रंथ -

१. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल - प्रा. जोशी शरद शंकर
२. आर्थिक विचारांचा विकास - डॉ. कोलंबंदन विजय
३. महाराष्ट्राचे अर्थकारण - कै. श्री. भ. आ. [illegible]
४. पंचायत भारती - महात्मा गांधी रोजगार हमी योजना ५ मे २०१९
५. पंचायत भारती - २० मार्च २०१९

Review Copy

Shri Shivaji Education Society, Amravati's

# SHRI SHIVAJI COLLEGE OF ARTS, COMMERCE AND SCIENCE, AKOLA

NAAC Reaccredited with A Grade (CGPA 3.24) College with Potential for Excellence [Status by UGC] Lead College [Status by SGB, Amravati University, Amravati] DST – FIST Support

One Day International Conference On

## Impact of Values based on M. K. Gandhi, Pt. J. Nehru, Dr. B. R. Ambedkar and Dr. Panjabrao Deshmukh's Philosophies in present situation"

21st January 2020

In collaboration with

**Shri Shivaji Education Society, Amravati**

# Certificate

This is to certify that Dr. /Mr. /Ms. Alka Anil Mankar of Shri Pundlik Maharaj MV. Nandura has participated/poster/presented a research paper entitled अर्थतज्ञ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर in the One Day International Conference on "Impact of Values based on M. K. Gandhi, Pt. J. Nehru, Dr. B. R. Ambedkar and Dr. Panjabrao Deshmukh's Philosophies in present situation"" organized by Shri Shivaji College of Arts, Commerce and Science, Akola on January 21st, 2020.

| | |
|---|---|
| **Hon'ble. Sheshraoji S. Khade** | **Dr. Rameshwar M. Bhise** |
| Secretary, | Principal |
| Shri Shivaji Education Society, Amravati | Shri Shivaji College, Akola |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 217 (C)
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

# अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. अलका अनिल मानकर
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा जि. बुलढाणा

असामान्य, अव्दितीय प्रज्ञासूर्य, क्रांतिसूर्य भारतीय संविधानाचे शिल्पकार, थोर समाजसुधारक, आर्थिक धोरणाचे धुरीण आंतराष्ट्रीय संबंधाचे जाणकार व भाष्यकार, कामगारांच्या न्याय अधिकारांचे लढवय्ये, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी जागरूक, देशातील आर्थिक विकासाबाबत चिंतन करून शाश्वत विकासाबाबत १९४२-४६ च्या दरम्यान आपली भूमिका मांडणारे थोर अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एकमेव भारतीय व्यक्तिमत्व अशा महान अष्टपैलूव्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्योत्तर भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आदर्श प्रारूप तयार केले. आधुनिक भारताच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान हे अविस्मरणीय आहे. आधुनिक भारताला त्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे भारतीय राज्यघटना . या राज्यघटनेमुळेच देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. आपली राज्यघटना मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे म्हणून हि सर्वश्रेष्ठ आहे. देशात शांतता आणि स्थैर्य असल्यामुळे देशाचा विकास होऊ शकला. भारताचा विकास कशाप्रकारे केला पाहिजे? यासंदर्भात डॉ. बाबासाहेबांनी जे विचार मांडले त्यातूनच ते एक नामवंत अर्थतज्ञ म्हणून कसे जगप्रसिद्ध झाले हे प्रस्तुत शोधनिबंधात मांडले आहे.

रुपयाच्या परिवर्तनीयते बद्दल अत्यंत अधिकारवाणीने भाष्य करू शकणाऱ्या अभ्यासकांपैकी डॉ. बाबासाहेब हे एक प्रमुख अर्थतज्ञ होते. रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या आर्थिक परिणामांबद्दल आणि भारतासप्रमुख आर्थिक महासत्ता होण्याबाबत त्यांनी केलेले लिखाण अतिशय पथदर्शी आहे. देशाचा आर्थिक विकास घडवून येण्यासाठी देशात आर्थिक, सामाजिक समानता असली पाहिजे हे बाबासाहेबांनी डोळ्यासमोर ठेवून राज्यघटना तयार केली . केवळ बहुभागाच्या हिताचा विचार न करता संपूर्ण देशातील प्रत्येकाला घटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची हमी दिली आहे. लोकशाही व्यवस्थेच्या रक्षणासोबतच आपल्या देशाने आज जागतिक महासत्तेच्या दिशेने झेप घेतली आहे त्याचे कारण राज्यघटनाच आहे. देशाचा आर्थिक विकास तेव्हाच होईल जेव्हा खऱ्या अर्थाने समाजातील विषमता नष्ट होईल. संविधानाच्या माध्यमातून वंचित समाजासाठी दिलेली संधीची समानता हि सर्वात महत्वाची तरतूद आहे.

आधुनिक भारताच्या उभारणीसाठी शासनाने 'मेक इन इंडिया', 'मेक इन महाराष्ट्र ' अभियान २०१५ पासून सुरु केलेल्या परिवर्तनाचा लाभ दलित उद्योजकांनाही झाला पाहिजे त्या दृष्टीने अनेक योजना शासकीय स्तरावर सुरु केल्या आहेत. २०१९ पर्यंत वंचित समूहातील बेघरांना घरे देण्याच्या घोषणेमागे, उक्तीतला सामाजिक न्याय कृतीत आणण्याचीच भावना आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या एका कलमात म्हटले आहे ते म्हणजे , कोणतीही चूक नसतांना एखाद्या व्यक्तीस हलाखीचे जीवन जगण्याची वेळ एत असेल तर त्याला या अवस्थेतून बाहेर काढण्याची जबाबदारी हि कल्याणकारी राज्य म्हणून सरकारवर आहे. बाबासाहेबांच्या मते शिक्षण हे सामाजिक-आर्थिक प्रगतीचे लक्षण आहे. शिक्षणामुळेच प्रगतीच्या आणि विकासाच्या विविध संधी प्राप्त होतात. हे त्यांनी आपल्या उदाहरणावरून सिद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रेष्ठ ज्ञानयोगी होते. ते प्रकाशपंडीत होते. त्यांची विव्दत्ता अव्दितीय अशी होती. मात्र यासाठी त्यांनी अपर कष्ट केले. प्रचंड व्यासंग्र केला परदेशात जाऊन अत्यंत कठीण परिस्थितीत उच्च शिक्षण घेतले. संशोधन केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकस मध्ये डॉ. ऑफ सायन्स पदवीसाठी "THE PROBLEM FO RUPEE ITS ORIGIN AND ITS SOLUTIONS. हा प्रबंध सादर

Review Copy

केला त्यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती असावी? यावर मुलभूत विचार मांडले आहेत. भारतात पूर्वी सुवर्ण परिमान आणि रुपयाचे परिमान अशी दोन्ही प्रकारची चलन पद्धती प्रचलित होती. भारताचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात गेल्यानंतर त्या कंपनीने स्वत:चे रुपयाचे नाणे आणलेत. परंतु पुढे ते अपुरे पडल्याने चलनाच्या मागणी पुरवठ्यात असमतोल निर्माण झाला तो दूर करण्यासाठी १८६४ मध्ये कागदी चलन वापरात आणले. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुवर्ण परिमान पद्धतीत भारतात किंमती कशा स्थिर होत्या हे दाखवून दिले.

भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ डिसेंबर १९२५ ला साक्ष देतांना स्पष्टपणे नमूद केले होते. की, चलननिर्मितीकरणाऱ्या संस्थेच्या चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अनिबंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.

गोरगरीब कष्टकरांशी निगडीत कामगार चळवळीतील त्यांचे योगदान आणि त्याद्वारे भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना देण्यासाठी केलेले कार्य हे सुद्धा फार महत्वाचे आहे. कामगारांच्या [illegible]णाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय कळकळ होती. कामगार मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेतून निघालेली आर्थिक क्रांतीसुत्रे राष्ट्र आणि मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी [illegible]मलेला सूर्यप्रकाश आहे. हे आर्थिक क्रांतीसुत्रेआज्च्या काळाची गरज आहे. Administration and Finance of the East India Company (ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थसूत्र) डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम. ए. च्या पदवीसाठी अवघ्या २४ व्या वर्षी हा शोधनिबंध लिहिला. या ग्रंथाच्या माध्यमातून अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी पहिले पाऊल ठेवले. हे १९१[illegible] चे पहिले [illegible] अर्थक्रांतीतील महत्वाचे पाऊल होते. या शोधनिबंधात ते आपले विचार परखडपणे मांडतात इंग्रज व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. या व्यापारी ते राज्यकर्ते पर्यंतच्या प्रवासात इंग्रजांनी भारतीयांचे केलेले शोषण आणि अल्पसे फायदे या दोन्ही मुद्द्यांची सांगोपांग चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे.

The Evolution of Provincial Finance in British India ( ब्रिटीश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती इस. १८३[illegible] ते १९२[illegible] या कालखंडातील ब्रिटीश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील पद्धतशीर संशोधन म्हणजे डॉ. आंबेडकरांचा ' भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक आभ्यास' हा शोधप्रबंध होय. हा शोधप्रबंध प्रा. सेलीमन यांच्या मार्गदर्शनाखाली पि.एच.डी. साठी कोलंबिया विद्यापीठात डॉ. आंबेडकरांनी १९१६ मध्ये सादर केला. हा शोध प्रबंध १९२५ मध्ये 'ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या नावाने प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पि.एच.डी. तर मिळवून दिलीच पण सार्वजनिक वित्ताच्या क्षेत्रात त्यांना प्रथमांक मिळवून दिला. अशा प्रकारचा एका भारतीयाने लिहिलेला आगळावेगळा पण वास्तव सांगणारा पहिलाच वित्तग्रंथ होय.

या ग्रंथातील महत्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे

1. भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात
2. भारतातील प्रादेशिक वित्ताची वाढ
3. भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात आणि वाढीवरील यंत्रणा वरील मुद्द्यांचा जगत पहिल्यांदाच डॉ. आंबेडकरांनी घेतलेला परामर्श म्हणजे हा शोधप्रबंध होय.

डॉ. बाबासाहेबाच्या मते

1. पैसा उभारणे आणि खर्च करणे या तात्कालिक गोष्टींच्या पलीकडे आर्थिक जबाबदारी स्वीकारणाऱ्यानी पाहायला शिकले पाहिजे.

Review Copy

2. भारतात शेतसाऱ्याचे प्रमाण शेतकऱ्यांना न पेलणारे होते. त्यांच्यावर सक्ती होत असे त्यामुळे शेतीचा विकास खुंटला.
3. जकात दोन्ही प्रकारे वसूल केली जाई. देशांतर्गत तसेच परदेशी व्यापार व्यवहारातून त्यामुळे एका बाजूस व्यापाराचा कोंडमारा झाला तर दुसऱ्या बाजूस उद्योगांची मुस्कटदावी झाली हा अनिष्टपरिणाम जकातीमुळे झाला.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात - करपद्धती एक क्रूर चेष्टा होती. कारण समांजरूपी शरीराच्या ज्या भागात दाट रक्त असते तेथे सुरी चालवली जात नव्हती. तर जो भाग गरिबी आणि दुर्बलतेच्या यातना सोसत होता. नेमका तेथेच घावबसत होता.
5. इ.स. १८०९ ते १८५७ या वर्षामधील खर्चाचे पृथःकरण करून या गरीब देशाच्या उत्पन्नापैकी ५२ ते ८० % खर्च युद्धसेवांवर पण शिक्षणासाठी, लोकोपयोगी कामासाठी, रेल्वे, जलवाहतूक, सिंचनामाठी, कालवे इ. बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद नाही.
6. प्रांतांना दिलासा देण्यासाठी आयकर चालत ठेवणे न्याय झाले असते परंतु भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातून न्याय यापूर्वीच हद्दपार झाला होता.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक कार्य आणि संशोधन ग्रंथसंपदेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यातील ज्ञान सर्वांना समजावून सांगणे काळाची गरज आहे. आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना आखताना शासकीय स्तरावर डॉ. बाबासाहेबांची संशोधनपर थिअरी दीपस्तंभासारखी आजही सत्याचा प्रकाश देत आहे. देशाच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी त्यांचे अर्थविषयक विचार अतिशय दूरदृष्टीचे व मुलभूत स्वरूपाचे आहेत.

देशातील कामगारासबंधी धोरण ठरविण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेबांनी पार पाडली. ७ ऑगस्ट १९४२ रोजी नवी दिल्ली येथे शासन, मालक आणि कामगारांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत कामगार संघटना, अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा अधिकार असावा व नफाचा अतिरेक नको इ. विषयावर चर्चा झाली. स्त्रीपुरुष समानतेचे ते पुरस्कर्ते होते. स्त्रीपुरुषांना समान मजुरी हे महान तत्व बाबासाहेबांनीच मांडले. कामगारांची प्रकृती चांगली राहावी व त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून कायद्याने ज्या पगारी सुट्ट्या दिल्या जातात त्या कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नविन दिशा देण्याचा प्रयत्न केल्यामुळे कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला. कोणत्याही व्यवसायात मिळणारा नफा हा मुक्त भांडवलावर नव्हे तर कामगारांच्या घामावर मिळतो हे महत्वपूर्ण विचार डॉ. बाबासाहेबांनी व्यक्त केले त्यावरून त्यांची श्रमप्रतिष्ठा लक्षात येते.

अर्थ, शेती, शिक्षण, आणि वाङ्मय या विषयांवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय लेखन अल्प असले तरी ते चिरंतन स्वरूपाचे आहे. राष्ट्रउभारणीत अर्थव्यवहाराला महत्वाचे स्थान असल्याने आर्थिक स्वातंत्र्यावर त्यांनी भर दिला होता. हिंदुस्थानात संपत्तीची वाटणीविषम स्वरुपात असल्याने टी राष्ट्रीय आपत्ती आहे असे ते म्हणत संपत्तीची समान वाटणी आणि जनकल्याण अभिन्न असावे असे त्यांचे मत होते. शेतीला उद्योग समजून आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर भर देतांना, शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या शोषणयंत्रणेवर बाबासाहेबांनी खरपूस टीका केली. मात्र अद्यावत शेती सुधारणेचा सबंध त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडला होता. शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या लहान धारण क्षेत्रे व त्यावरील उपाय (Small Holding in india and Their Remedies)



Review Copy

या निबंधात कृषिविषयक प्रश्न , त्यावरील उपाय यासंदर्भात विचार मांडले . त्यांच्या मते , मोठी धारण क्षेत्रे किफायतशीर व लहान धारण क्षेत्रे अकीफायतशीर हा युक्तिवादचुकीचा ठरू शकते. कार्यक्षम शेतीसाठी भांडवल व आवश्यक साधन वाढविण्यावर भर दिला , सहकारी व सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला तर कृषी विकास होतो. विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे पडीत जमीन लागवडीसाठी आणल्यास भूमिहीनांना रोजगार मिळेल शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगीकरणावर त्यांनी भर दिला . औद्योगीकरणाने ग्रामीण भागातील लोकांचा शहराशी संपर्क वाढेल . विचारांची आदानप्रदान होईल. व्हाईसराय कोन्सीलमध्ये मंत्री म्हणून काम करतांना १९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम,जल, व विद्युत हि खाती अतिशय कुशलतेने हाताळली. त्यांच्या कार्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडली. देशाच्या आर्थिक विकासात बाबासाहेबांनी मांडलेले आर्थिक नियोजना विषयी विचार महत्वाचे ठरतात. भारताच्या विकासाबाबत विचार मांडतानाबाबासाहेब म्हणतात आपल्या देशात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधने आहेत. त्या नैसर्गिक साधनांवर आधारित आपले उद्योगधंदे असले पाहिजेत. भारताचा विकास कशाप्रकारे केला पाहिजे? या संदर्भात ते म्हणतात कि, " आपल्या देशातील नैसर्गिक स्त्रोतांचे नियोजन करून त्या स्त्रोतांचा योग्य उपयोग केला तर भारताचा विकास होईल." देशात औद्योगिकरण घडवून आणण्यासाठी विद्युत आवश्यक आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी विद्युतचीनिर्मितीकरण्याबाबत राष्ट्रीय धोरण ठरविले विद्युतच्या संदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवताना २५ ऑक्टोंबर १९४३ रोजी डॉ. आंबेडकरांनी भारतामध्ये विद्युत हि स्वस्त आणि मुबलक का असावी? असा प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर त्यांनी स्वतः दिले. त्यांच्या मते स्वस्त आणि मुबलक विद्युत असल्याशिवाय भारताचे औद्योगीकरण यशस्वी होवू शकत नाही. यावरून डॉ. आंबेडकरांची दूरदृष्टी आपल्या लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हि एक व्यक्ती नव्हे तर एक विचार आहे. ज्या विचाराच्या आधारावर आजची आपली आधुनिक भारताची अर्थव्यवस्था खंबीरपणे विकासाच्या वाटेवर वाटचाल करीत आहे. डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संशोधन कार्यातून जे विभिन्न आर्थिक विचार मांडले त्या आधारावर जर आर्थिक नियोजनाची अंमलबजावणी झाली असती तर देशात आर्थिक , सामाजिक समानता प्रस्थापित होवून आर्थिक विकास घडून येईल. डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक विचार तात्कालिक स्वरूपाचे नाहीत. त्यांच्या आर्थिक विचारांना वैश्विक महत्व आहे. भारतीय रुपया, चलननिर्मिती, भाववाढ इ . आर्थिक प्रश्नांबाबत मांडलेले विचार आजही उपयुक्त आहेत. अशा या थोर अर्थतज्ञाचे आर्थिक तत्वज्ञानाचे मुल्सुत्र आहे ' बहुजन हिताय, बहुजन सुखाय'

संदर्भग्रंथ -

- डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, अनुवादक - प्रा. प्रमोद नंदेश्वर The Problem of the Rupee Its origin and its solution (Vol No. 6)
- धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन ,, मुंबई.
- डिसेंबर २०१२ लोकराज्य
- जुलै, सप्टेंबर २००६ अर्थसंवाद
- प्रा. ठोंबरे, आर्थिक विचारांचा इतिहास



Review Copy